प्रेसनोट

दिनांक १३/०२/२०२१

सानपाडा पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथील परिविक्षाधिन पोलीस उप निरीक्षक यांस लाच स्विकारताना लाचलचुपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई / ठाणे परिक्षेत्र, ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | सानपाडा पोलीस स्टेशन, नवी मुंबई गु.रजि. नं. १६/२०२१, |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | राहुल शत्रुघ्न कोळी वय २९ वर्षे,पद :- परिविक्षाधिन पोलीस उप निरीक्षक, ( सत्र क्र.११७) नेमणुक सानपाडा पोलीस स्टेशन, नवी मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ३०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ३०,०००/- |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचे वडीलांनी त्यांचे मालकीचा सी/३ किऑक्स कॉम्प्लेक्स, सानपाडा स्टेशन नवी मुंबई येथे दुकानगाळा जुलै २०१९ मध्ये श्री. चुन्निलाल खटनावलिया यांना भाडेतत्वावर चालविण्यास दिला होता. परंतु काही महीन्यानंतर चुन्निलाल खटनावालया यांनी सदर दुकानगाळयाचे भाडे देणे बंद केल्याने तक्रारदार यांनी सदरचा दुकानगाळा श्री. चुन्नीलाल यांना खाली करण्यास सांगीतले होते. परंतु श्री. चुन्नीलाल यांनी सदरचा दुकानगाळा खाली न करता कोवीड विषाणुच्या संक्रमण काळात ते दुकानमालक यांना काहीएक कल्पना न देता दुकानगाळा बंद करून त्यांचे मुळगावी निघुन गेले. त्यांनतर तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०२० मध्ये सदर दुकानगाळयास श्री. चुन्नीलाल यांचे कुलुप असतांना स्वत:चे लॉक लावले होते. सदर प्रकरणी तक्रारदार व चुन्निलाल खटनावालया यांचेमध्ये वाद होवुन श्री. चुन्निलाल यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे विरूध्द सानपाडा पोलीस स्टेशन नवी मुंबई येथे तक्रारअर्ज केला होता. सदर तक्रारअर्ज प्रकरण मिटविण्यासाठी लोकसेवक श्री. राहुल शत्रुघ्न कोळी, परिविक्षाधिन पोलीस उप निरीक्षक सानपाडा पोलीस स्टेशन, नवी मुंबई यांनी तक्रारदार यांच्याकडे रू.३०,०००/- लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली असतांना त्यांना दिनांक १३/०२/२०२१ रोजी ०१.१८ वाजता रंगेहात पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांनी आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे ला.प्र.वि. नवी मुंबई कार्यालयाशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई-मेल ऑनलाईन तक्रार :- **spacbthane@ mahapolice.gov.in**
ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री नं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉट्सअॅप क्र. :- ९९३०९९७७००

( शिवराज बेंद्रे )
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with CamScanner